दिनांक 20 एप्रिल, 2014

# निवडणुक प्रचार अभियान डायरी 20.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

लोकपालाची नियुक्ती करण्याचा वाद थांबण्याची चिन्हे नाहीत. युपिए सरकारने लोकपाल अधिनियमच्या अंतर्गत नियम बनविले. प्राथमिक दृष्ट्या हे नियम अधिनियमाच्या विरुद्ध आहेत. हा एक असा विषय आहे की, ज्याला आधी सर्वोच्च न्यायालयासमोर आव्हान दिले गेले आहे.

निवडणुक घोषित होण्याआधी युपिए सरकारने लोकपालचे अध्यक्ष आणि त्यांच्या सदस्यांची गडबडीत नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. घाईघाईत एका शोध समितीची नियुक्ती करण्यात आली. कार्मीक विभागाने शोध समितीचे अधिकार हडप केले आणि लोकांची एक लहान सूची तयार केली, त्यामधून नियुक्ती करण्यात येणार होती. शोध समितीच्या काही नामी सदस्यांसह सर्व लोक यासाठी स्वीकारण्यात आलेल्या प्रक्रियेने नाखुष होते. दोन प्रतिष्ठित सदस्य फली एस.नारीमन आणि न्यायमूर्ती के.टी.थॉमस यांनी याच कारणास्तव शोध समितीतून राजीनामा दिला.

आज पूर्ण कोरम(एकूण संख्या) च्या बरोबर कोणतीही शोध समिती नाही आहे. शोध समिती स्थापित झाल्यानंतर, त्या सर्व लोकांच्या नावांची चौकशी करणार ज्यांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली गेली आहे. त्यानंतर शोध समिती याची पुष्टी करेल आणि यास राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल.

देशात अर्ध्यापेक्षा अधिक निवडणुक झाली आहे. निवडणुक निकाल घोषित होणे आणि नवे सरकार स्थापित होण्यासाठी 26 दिवस बाकी आहेत. काय युपिएसाठी हे योग्य असेल की ती आपल्या निश्चित रवानगीच्या आधी लोकपालाची नियुक्ती करण्यामध्ये घाई करेल? निश्चितपणे नाही.

जर युपिए या अवस्थेत नियुक्तींच्या मागे धावणार असेल तर हे राजनैतिक दृष्ट्या निर्लज्जपणाचे काम आणि आचार संहितेचे उल्लंघन असेल जे योग्य नाही. याशिवाय ही प्रक्रिया कायदेशीर दृष्ट्या संशयास्पद आहे. अशाप्रकारची घाई-गडबड लोकपालच्या स्थापने आधी त्याची विश्वसनीयता घालवून बसेल. या प्रक्रियेला त्वरित रोखले गेले पाहिजे. पंतप्रधान कार्यालयाच्या या प्रयत्नाला यशस्वी होण्यासाठी परवानगी दिली जाऊ शकत नाही की ती शोध समितच्या रिकाम्या जागा भरण्यासाठी निवड समितीची बैठक बोलवेल.

डॉ. मनमोहन सिंह आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत, त्यांना गंभीरतेने याबद्दल आत्मविश्लेषण करण्याची गरज आहे आणि जर सरकारच्या निश्चित रवानगीच्या आधी लोकपालाच्या स्थापनेसाठी अशा प्रकारे गडबड केली तर त्यांना फक्त अशा प्रकारचे पंतप्रधान म्हणून लक्षात ठेवले जाईल की, ज्यांनी पक्षाच्या नेतृत्वाच्या आदेशावरुन संस्थांना नष्ट केले. जर ते अजुनही घाई-गडबड करणार असतील तर भारताची लोकशाही प्रणाली इतकी मजबूत आहे की, त्यांना यशस्वी होऊ देणार नाही. पंतप्रधानांकडे राहिलेल्या विश्वसनीयतेशिवाय गमावण्यासारखे काही शिल्लक राहिलेले नाही.